# चला, नद्या वाचवू!

## व्हीजेटीआयच्या विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम






● प्रशांत सिनकर

**मुंबई :** मुंबापुरीत पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असल्यामुळे तो थांबवण्याच्या दृष्टीने अनेक पर्यावरणप्रेमी प्रयत्न करत आहेत. मात्र आता हे प्रयत्न मुंबईपुरतेच मर्यादित न ठेवता संपूर्ण राज्यात राबवण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे मुंबईच्या 'व्हीजेटीआय' या अग्रगण्य अभियांत्रिकी संस्थेने पुढाकार घेतला असून इको निड्स फाऊंडेशन आणि व्हिजेटीआय यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनासाठी एकत्र काम करण्याचे ठरवले आहे. त्यात नद्यांचे पावित्र्य आणि अस्तित्व कसे टिकेल, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून औरंगाबादेतील खाम नदीमधील गाळ, प्लास्टिकच्या पिशव्या व कचरा काढून जनजागृती करण्याचा यशस्वी यशस्वी कार्यक्रम राबवण्यात आला.

संस्थेच्या प्रांगणात अनेक विधायक उपक्रमांची अमलबजावणी केली जाते. परंतु हे उपक्रम सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतात असे नाही. म्हणून त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी चळवळ उभी केली आहे. व्हीजेटीआयमध्ये नुकताच 'इको-डे' साजरा करण्यात आला असून पुढील पंधरवड्यात पर्यावरण जनजागरणाचे कार्यक्रम सुरू केले आहेत. ते संपूर्ण राज्यात राबवले जाणार आहेत. पर्यावरण संवर्धन याविषयी माहिती देताना फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रियानंद आगळे म्हणाले, पर्यावरण संवर्धनासाठी आज संशोधकांनी सामाजिक बांधिलकी जोपासणे गरजेचे आहे. व्हिजेटीआयसारख्या संस्थेत अनेक हुशार विद्यार्थी शिकत आहेत. गेल्या काही वर्षांत मुंबईतील पर्यावरण ढासळल्याचे अनेक दाखले आहेत. २६ जुलै असो किंवा २००९ मध्ये वरुण राजाचे रुसणे असो. यंदाचा उन्हाळाही रेकॉर्डब्रेक करेल, असेही संकेत आहेत. ही पर्यावरणासाठी धोक्याची सूचना आहे. हा धोका टाळण्यासाठी आम्ही 'इको-डे' अभियान सुरू केले आहे. आमच्या टीमने नुकताच औरंगाबाद शहराचा अभ्यास दौरा केला. हे शहर ऐतिहासिकदृष्ट्या खूपच महत्त्वाचे आहे, परंतु दुर्दैवाने यालाही प्रदूषणाचे ग्रहण लागले आहे. येथील खाम नदीतील प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले आहे. जागतिक जलदीनाचे औचित्य साधून आम्ही नदीतील गाळ, कचरा, प्लास्टिक पिशव्या काढून नदीची साफसफाई केली. यात आमच्या कामाचा उत्साह बघून औरंगाबादकरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. एवढेच नाही तर त्यांनी स्वतःही पुढाकार घेतला. नदीतील पाण्याचे नमुने आम्ही तपासणीसाठी घेतले असून व्हीजेटीआयमध्ये त्याचे परीक्षण केले जाणार आहे. त्यानुसार नदीतील प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना कराव्या, याचाही अभ्यास केला जाणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील नद्यांना प्रदूषणाच्या गर्तेतून कसे बाहेर काढता येईल, यासाठी आम्ही विद्यार्थ्यांचे अभ्यासदौरे काढणार आहोत. यात विद्यार्थ्यांना पार्यवरण समस्याविषयी प्रकल्प दिले